# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


सूचना

क्रमांक : २अ/एडीएम/पदव्युत्तर पदवी प्रवेश/२०१८/ ८५८

दिनांक : 27 JUL 2018

विषय : पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेताना अंतिम वर्षाची गुणपत्रिका/प्रमाणपत्र सादर करण्यास कालावधी देणेबाबत...

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व तांत्रिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू असून त्यासाठी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे. त्यानुसार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेशाची कट ऑफ डेट दिनांक १४.८.२०१८ अशी जाहीर करण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २४.४.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीचे राजपत्र असाधारण क्रमांक १०५ मधील नियम १२(i) व दिनांक ५.६.२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्र असाधारण क्रमांक २०१ मधील प्रवेश नियमानुसार केंद्रीभूत प्रवेश फेरी पार पडल्यानंतर उमेदवार प्रवेश निश्चितीसाठी संबंधित संस्थेत प्रवेश निश्चित करण्यासाठी जाईल त्यावेळी उमेदवाराने सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करणे अनिवार्य केले आहे. तथापि काही विद्यापीठांकडून पदवी अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर न झाल्यामुळे अशा उमेदवारांचे प्रवेश अंतिम निकालाच्या अधीन राहून केले जातात. ही वस्तुस्थिती विचारात घेता पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाला बसलेले उमेदवारांच्या बाबतीत पदवी अभ्यासक्रमाची **अंतिम वर्षाची गुणपत्रिका/ प्रमाणपत्र प्रवेशित संस्थेत सादर करण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे मुदत** देण्यात येत आहे याची सर्व प्रवेशित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशाचा कट ऑफ दिनांक | गुणपत्रिका सादर करण्यासाठी अंतिम दिनांक | अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशाचा कट ऑफ दिनांक | गुणपत्रिका सादर करण्यासाठी अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एमबीए/एमएमएस | १४.८.२०१८ | १०.८.२०१८ | ४ | एमसीए | २५.८.२०१८ | २१.८.२०१८ |
| २ | एम.ई/एम.टेक. | ३१.८.२०१८ | २७.८.२०१८ | ५ | एम.आर्च. | २५.८.२०१८ | २१.८.२०१८ |
| ३ | एम.एचएमसीटी | २४.८.२०१८ | २०.८.२०१८ | ६ | एम फार्म | ३१.८.२०१८ | २७.८.२०१८ |

जर एखादया विद्यापीठाचे पदवी अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष निकालाची प्रत उपलब्ध नसल्याप्रकरणी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित करू इच्छिणा-या उमेदवारांना विद्यापीठांनी ऑनलाईन पध्दतीने जाहीर केलेले निकाल ते शिकत असलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या प्राचार्यांनी साक्षांकित करून असे निकाल सादर करण्यासही परवानगी देण्यात येत आहे. जे उमेदवार वरील मुदतीत त्यांचे पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रिका/प्रमाणपत्र सादर करू शकणार नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतील.

उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश निश्चिती केल्यानंतर उपरोक्त मुदतीपर्यंत सादर केलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष उत्तीर्ण केलेल्या गुणपत्रिका/प्रमाणपत्रानुसार संबंधित संस्थांनी संबंधित विभागीय कार्यालयांकडे जाऊन गुणांमध्ये बदल करून घ्यावा. तसेच वरील मुदतीत गुणपत्रिका /प्रमाणपत्र सादर करू न शकल्यामुळे प्रवेश रद्द केलेल्या उमेदवारांची माहिती विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास पाठविण्यात यावी.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक, तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव

\\१९२.१६८.१.९\Desk२a\२०१८-१९\notification २०१८-१९\last date for submission of final year mark sheet.docx